जा. क्र.आसंउकें/रामेश्वर/ ३०१ /२०२२
आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर.
मु. पो. विजयदुर्ग, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.
मो.नं- ९३७०९७५८१८
दिनांक – 05/05/2022

प्रति,

______________________

______________________

______________________

विषय:— पॅक्लोब्युट्राझॉल खरेदी करण्याचे दरपत्रक ....

महाशय,

आंबा संशोधन उपकेंद्र रामेश्वर, ता.देवगड जि. सिंधुदुर्ग या कार्यालयाच्या प्रक्षेत्रावर असणाऱ्या कलमांना पॅक्लोब्युट्राझॉल या वाढनिरोधक रासायनिक द्रव्यांचे प्रमाण द्रावण नियमित फलधारणेसाठी टाकण्यात येते आणि अधिक उत्पादन मिळण्यासाठी शिफारशीप्रमाणे प्रायोगिक व इतर आंबा कलमांना पॅक्लोब्युट्राझॉल संजीवक देणे आवश्यक आहे. सदर पॅक्लोब्युट्राझॉल खरेदी करण्याचे दरपत्रक 13/05 / २०२२ पर्यंत निम्नस्वाक्षरीकार यांचे नावे या कार्यालयात मागविण्यात येत आहे. सदर लखोटा सिलबंद असणे आवश्यक असून लखोटावर 'पॅक्लोब्युट्राझॉल खरेदी करण्याचे दरपत्रक ' असा उल्लेख करावा.

| अ.क्र | तपशिल | खरेदीचे प्रमाण | शेरा |
|---|---|---|---|
| १ | पॅक्लोब्युट्राझॉल (कल्टार) | ५ लिटर | 'पक्लोब्युट्राझॉल खरेदी करण्याचे दरपत्रक 'आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर येथे पोहोच असावे.<br>(खर्च, वाहतूक, हमाली व इतर खर्चाच्या बाबीविषयी सविस्तर खुलासा दरपत्रकात करण्यात यावा.) |

अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

१. सदर दरपत्रक मोहरबंद असणे आवश्यक आहे.

२. साहित्यासंबधी विस्तृत माहिती छापील पत्रकासह द्यावी.

३. दरपत्रक सुमारे ३ महिन्यापर्यंत वैध असावे.

४. साहित्यासंबधी विविध कर, बांधणी खर्च,वाहतूक, हमाली व इतर खर्चाच्या बाबीविषयी सविस्तर खुलासा दरपत्रकात करण्यात यावा.

५. बिलाची रक्कम अदा करण्यासबंधी आपल्या काही अडचणी असल्यास त्याचा स्पष्ट खुलासा करावा.

६. आपण स्वत: उत्पादक किंवा कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्यास त्यासंबधीचा योग्य तो दाखला तसेच कंपनीची छापील दरसूची सोबत द्यावी.

७.दरपत्रक विहित मुदतीत या कार्यालयास प्राप्त होणे आवश्यक आहे. टपाल दिरंगाईस/विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

८. दरपत्रके नाकारण्याचा किंवा स्वीकारण्याचा अधिकार याकार्यालयाने राखून ठेवलेला आहे.

९. सदर रकमेवर आयकर भरल्याची पावती अथवा हमीपत्र द्यावे लागेल.

आपला विश्वासू

(स्वाक्षरी)